# राष्ट्रीय आयुष अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

## योग प्रशिक्षक (सत्र निहाय) करीता जाहिरात जिल्हा सांगली

सांगली जिल्हयात कार्यरत असणाऱ्या ११ आयुष्मान आरोग्य मंदिर - आयुष केंदाच्या (कसबेडिग्रज, भवानीनगर, येडेनिपाणी, रेठरेधरण, आमणापुर, वसगडे, लेंगरे, माहुली, पारे, मालगांव, सावर्डे) ठिकाणी योग अभ्यासक्रम आयोजित करणारे विद्यापीठ किंवा संस्थांमधुन योग प्रशिक्षकांची पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांची प्रशिक्षक म्हणुन निवड करणेत येणार आहे.

| अ.क्र. | तालुका | आयुष्मान आरोग्य मंदिर - आयुष |
|---|---|---|
| १ | खानापुर | माहुली, पारे, लेंगरे |
| २ | मिरज | कसबेडिग्रज, मालगांव |
| ३ | पलुस | आमणापुर, वसगडे |
| ४ | तासगांव | सावर्डे |
| ५ | वाळवा | भवानीनगर, येडेनिपाणी, रेठरेधरण, |

आयुष्मान आरोग्य मंदिर - आयुष केंद्राच्या प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार योग प्रशिक्षक यांचे कामाचे स्वरुप व मानधन खालील प्रमाणे.

१) आयुष्मान आरोग्य मंदिर - आयुष केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांनी तयार केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे महिना भरामध्ये कमीत कमी एक तासाचे ३२ योगसत्र आयोजित करणेचे आहे.

२) ३२ योगसत्रापैकी २० योगसत्र आयुष्मान आरोग्य मंदिर - आयुष केंद्रामध्ये व उर्वरीत १२ योगसत्र कार्यक्षेत्रामध्ये (शाळा, आश्रमशाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत, महिला बचत गट, जेष्ठ नागरिग संघ व इतर शासकीय/ निमशासकीय संस्था) घेण्याचे आहे.

३) ३२ योगसत्रांपैकी कार्यक्षेत्रामध्ये कमीत कमी एक तासाचे दोन IEC स्वरुपाचे उपक्रम राबविण्याचे आहे.

४) योगा विषयामध्ये आशा, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक व इतर कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेऊन क्षमता वृध्दी करण्याची आहे. वैद्यकिय अधिकारी, आशा, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक यांना जनजागृती मोहिम आयोजीत करण्यामध्ये मदत करणे.

५) योग विषयक दस्तऐवज निममितपणे तयार करुन मासिक अहवाल सादरीकरणामध्ये मदत करणे, तसेच आशा, आरोग्य सेविका यांना कार्यक्षेत्रामध्ये योग विषयक उपक्रमामध्ये देखरेख करण्यास मदत करणे.

६) वर्षभरात कार्यक्षेत्रामध्ये समुदाय स्तरावर कमीत कमी दोन योग विषयक जनजागृती मोहिम मोठया प्रमाणावर आयोजित करण्यात यावी. योगसत्राकरीता मोठया संख्येने नागरिक उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.

७) आयुष्मान आरोग्य मंदिर - आयुष केंद्रांसाठी निवड केलेल्या योग प्रशिक्षक (अर्ध - वेळ) (पुरुष/स्त्री) यांना रु.८०००/- प्रतिमाह मानधन देय असून त्यांनी रु.२५०/- प्रतितास याप्रमाणे कमीत कमी ३२ तास/प्रतिमाह योगसत्र आयोजित करावयाची आहेत.

उपरोक्त पद हे पुर्णतः कंत्राटी स्वरुपाचे असुन सदरबाबत कोर्टामध्ये दावा अथवा हक्क सांगता येणार नाही तसेच उपरोक्त नियुक्तीचे सर्व अधिकारी मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली यांचेकडे राहतील.

---

# अटी व शर्ती

१) इच्छूक उमेदवारांनी दि.१०/०८/२०२४ ते दि.२०/०८/२०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यत आरोग्य विभाग जिल्हा परिषद, सांगली येथे प्रत्यक्षरीतीने सादर करावा.

२) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे,

१) वयाचा पुरावा, २) योग प्रशिक्षक प्राप्त पदवी/पदवीका प्रमाणपत्र

३) शैक्षणीक अर्हता गुणपत्रिका ४) शासकिय/निमशासकिय/ खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव ५) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटोसह सादर करावा.

उमेदवारांचे अर्ज प्रत्यक्षात स्विकारण्यात येतील. (वरील मुद्दा क्र १ पहा)

३) पोस्टाद्वारे /कुरियरद्वारे /ऑनलाईन/ई-मेलद्वारे कोणतेही अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

४) पात्र/अपात्र उमेदवाराची यादी जिल्हा परिषद व आरोग्य विभागाच्या (https://zpsangli.com) वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

५) पात्र उमेदवारांपैकी कागदपत्रे तपासणी व गरजेनुसार मुलाखती करीता दुरध्वनी द्वारे संपर्क साधून बोलवण्यात येईल. संबंधीत उमेदवारांनी अर्जामध्ये कार्यरत मोबाईल नंबर व कार्यरत ई मेल आयडी नमुद करणे अनिवार्य आहे. याबाबत कोणतीही तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

६) सदरची पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणासंबंधी दावा करणेचे अधिकार राहणार नाहीत.

७) आवश्यक पात्रता असलेले उमेदवार न मिळाल्यास त्या पदांकरिता असलेली पात्रता अनुभव व अर्हता नुसार शिथिल करणेचे अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत.

८) पदांसाठी वेतन हे एकत्रित मानधन आहे. योग सत्र घेणेसाठी आयुष आरोग्य वर्धिनी केंद्राच्या ठिकाणी जाणेकरीता कोणत्याही प्रकारचे प्रवासशुल्क दिले जाणार नाही.

९) नियम व अटींच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देणेत येतील. उमेदवारांची नियुक्ती ही गुणनिहाय करणेत येईल. उच्च शैक्षणिक अर्हता धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

१०) विहीत नमुन्यात अर्ज साक्षांकित प्रतीसह जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सांगली येथे दि.२०/०८/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

११) अर्जदाराने ए ४ आकाराच्या कागदावर अर्ज करावयाचा असून त्यामध्ये खालील बाबी अंतर्भूत असाव्यात सोबत अर्जाचा नमूना प्रसिध्द केला आहे.

अ) उमेदवाराची सर्वसाधारण माहिती :-

१) अर्ज केलेल्या पदाचे नाव २) ठळक अक्षरात स्वतःचे संपूर्ण नाव

३) अर्जदाराचा पत्ता, दूरध्वनी व मोबाईल क्रमांक ४) ईमेल आयडी ५) जन्मतारीख

६) शैक्षणिक अर्हतेचा संपूर्ण तपशिल - अभ्यासक्रमाचे नाव उत्तीर्ण झालेचे वर्ष गुणांचा तपशिल व टक्केवारी ७) कामाचा अनुभव - काम केलेली संस्था, एकूण कालावधी, संबंधित संस्थेत कोणत्या पदावर काम केलेले आहे.

ब) आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती :- १) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र २) पदानुसार संबंधित काऊन्सिलकडे रजिस्ट्रेशन केलेले नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ३) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला ४) अनुभवाचे प्रमाणपत्र ५) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो

१२) अर्जदार हा संबंधित पदांसाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदारा विरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१३) मुलाखती करीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१४) सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेली पात्रता (अर्हता व अनुभव) आवश्यकतेनुसार शिथील करण्यात येईल. तसेच राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेता खुल्या प्रवर्गातील प्रतिक्षा यादीतील उमेदवाराला तात्पुरती नेमणूक देण्यात येईल.

१५) अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्याच्या सोईनुसार ठिकाण बदलून मागता येणार नाही.

१६) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरीता संबंधित कौन्सिलकडून प्राप्त रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.

१७) कोणतीही पूर्व सुचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत.

सही/-
सदस्य सचिव निवड समिती,
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

------------------------------------------------

राष्ट्रीय आयुष अभियान,
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा सांगली.

पासपोर्ट आकाराचा अलिकडील छायाचित्र

पदाचे नाव - योग प्रशिक्षक आयुष्मान आरोग्य मंदिर- आयुष
(कसबेडिग्रज, भवानीनगर, येडेनिपाणी, रेठरेधरण, आमणापुर, वसगडे, लेंगरे, माहुली, पारे, मालगांव, सावर्डे)

१) उमेदवाराचे संपुर्ण नाव -
२) जन्म तारीख - / / , वर्ष महिना
३) संपुर्ण पत्ता-
४) स्वतःचा मोबाईल नंबर (नमुद करणे अनिवार्य)-
५) ई - मेल आय डी-
६) शैक्षणिक पात्रता -

| धारण केलेली पदवी (सर्व) | विदयपीठ/बोर्डाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

७) अनुभव -

| अ.क्र | काम केलेल्या कार्यालयांचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिना | दिवस |
| | | | | | |

८) अर्जासोबत खालील प्रमाणे सांक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)
१)............................... २)...............................
३)............................... ४)...............................
५)............................... ६)...............................

वर नमुद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती प्रमाणे खरी व बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे, याची खात्री करुनच मी हा अर्ज करीत आहे.

मी प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास आणि कार्यवाही द्वारे नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहीन. सदर बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही याची मी हमी देतो.

ठिकाण -........................ स्वाक्षरी .....................
दिनांक - / /२०२४ अर्जदाराचे नाव -